# : पाहिजेत :

उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/(११/१५)/मशि-१ दिनांक २८ जानेवारी २०१९ या शासन निर्णयास अनुसरून उच्च शिक्षण संचालनालय, पुणे मुख्यालय आणि मुंबई नागपूर व औरंगाबाद विभागीय सहसंचालक कार्यालयामध्ये सुधारीत रुपये ३५,०००/- ठोक मासिक मानधनावर विधी अधिकारी पदे भरण्याकरिता खालील अटी व शर्तीनुसार ऑनलाईन www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज करावयाचा अंतिम दिनांक **१२.०३.२००१९**

| अ क्र | ठोक मासिक मानधनावर भरावयाची विधी अधिकारी यांची पदे | सोपविण्यात येणारे विभाग |
|---|---|---|
| १ | विधी अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे मुख्यालय | मुख्यालय व पुणे |
| २ | विधी अधिकारी, विभागीय सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, औरंगाबाद | औरंगाबाद, नांदेड, जळगाव |
| ३ | विधी अधिकारी, विभागीय सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, नागपूर | नागपूर, अमरावती |
| ४ | विधी अधिकारी, विभागीय सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, मुंबई | मुंबई, पनवेल, कोल्हापूर, सोलापूर |

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

१. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल.
२. विधि अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.
३. उमेदवार सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबत ज्ञानसंपन्न असेल, ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
४. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.
५. विधि अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ३५ वर्षापेक्षा जास्त नसेल.

**विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदा-या:**

१. सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे
२. परिच्छेदनिहाय अभिप्राय तयार करणे /सेवाविषयक/प्रशासकीय/विभागीय चौकशी इत्यादी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे/सादरकर्ता अधिका-यांकडे पाठपुरावा करणे.
४. शासन प्रतिवादी आहे, अशा प्रकरणी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-यांचे मदतीने तयार करणे.
५. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम अधिका-यांची मान्यता घेऊन, न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल याची दक्षता घेणे.
६. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तददनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
७. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास संबंधित सरकारी वकीलांशी संपर्क साधून अपीलाचा अंतीम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे. तसेच विहित मुदतीत अपील दाखल करुन न्यायनिर्णयास स्थगिती मिळविण्यासाठी पाठपुरावा करणे.
८. नेमून दिलेल्या संबंधित विभागातील सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी नोडल अधिकारी म्हणून काम पहाणे.
९. विधिविषक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य व विहित मुदतीत पार पाडणे.
१०. निकाली निघालेल्या प्रकरणांबाबत न्यायालयाच्या आदेशनुसार कोणती कार्यवाही करणे अपेक्षित आहे, याबाबत अवगत करुन क्षेत्रीय स्तर, संचालनालय स्तर व शासनस्तरावर पाठपुरावा करणे.

११. विधी अधिका-यांकडे सोपविण्यात आलेल्या विभागातील न्यायालयीन प्रकरणांचा मासिक आढावा/अहवाल त्यांनी पुणे मुख्यालयात कार्यरत विधि अधिका-यांकडे सादर करुन तो पुणे मुख्यालयातील विधि अधिका-याने संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत उच्च व तंत्रशिक्षण विभागास सादर करणे.

१२. उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सह/उप सचिव (विधी) यांच्या संपर्कात राहून आवश्यक तेथे त्यांचे मार्गदर्शन घेऊन कार्यवाही करणे.

**विधी अधिकारी या पदावरील नियुक्ती ही खालील अटींच्या अधीन राहील.**

१. सदर पदांवरील नेमणूक ही पूर्णत: तात्पुरती असेल. सदरहू विधि अधिकारी शासकीय अधिकारी म्हणून गणले जाणार नाहीत. तसेच त्यांना सेवासातत्य मिळण्याबाबत कोणताही हक्क राहणार नाही. त्यांची नियुक्ती दिनांक २८.०१.२०१९ च्या शासन निर्णयासोबत जोडलेले परिरिष्ट-अ मधील विनिर्दिष्ट करारनाम्याच्या अधीन राहील.

२. सदर नेमणुका करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यकतेनुसार शासनाच्या पुर्वपरवानगीने मुदतवाढ तथा पुन:श्च नियुक्तीबाबत विहित कार्यपध्दतीनुसार निर्णय घेण्यात येईल. तसेच नियुक्त विधि अधिका-यांच्या सेवा विहित कार्यपध्दती अनुसरून कोणत्याही टप्प्यावर समाप्त करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिका-यांना राहतील.

३. नेमणूक करण्यात येणा-या विधि अधिका-यांना ठोक मासिक मानधनाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

सही/-

**(डॉ.धनराज माने)**

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, पुणे-१